## चर्चेतील व्यक्तीशी थेट संवाद

> शिवाजी विद्यापीठाचा समृद्ध शैक्षणिक वारसा अधिक वृद्धिंगत करण्यासाठी काम करणार आहे. 'समाजाशी नाळ जोडणारे विद्यापीठ' ही प्रतिमा जपणार.

### कौशल्य विकास अभ्यासक्रमांवर भर देऊ

# विद्यार्थ्यांसाठी 'स्किल ऑफ चॉईस' : कुलगुरू शिर्के

संतोष मिठारी । लोकमत न्यूज नेटवर्क

संडे स्पेशल मुलाखत



*शिवाजी विद्यापीठाच्या तेराव्या कुलगुरुपदी डॉ. डी. टी. शिर्के यांची मंगळवारी (दि. ६) निवड झाली आहे. त्यांच्या निवडीच्या रूपाने या कुलगुरुपदाचा कोल्हापूरला पहिल्यांदाच बहुमान मिळाला आहे. विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी या घटकांसाठी राबविले जाणार उपक्रम, विद्यापीठ विकासाची भविष्यातील पावले, आदींबाबत डॉ. शिर्के यांच्याशी साधलेला हा थेट संवाद.*

**प्रश्न :** विद्यार्थ्यांच्या विकासासह रोजगाराभिमुखता वाढविण्यासाठी काय करणार आहात?

**उत्तर :** रोजगाराभिमुखता वाढविण्यासाठी कौशल्य विकासावर भर दिला जाईल. त्यासाठी 'स्किल ऑफ चॉईस' उपक्रम राबविणार आहे. त्यात विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे आणि हव्या असलेल्या कौशल्याचे प्रशिक्षण देण्यात येईल. शिक्षण, कौशल्यविकासाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना हटके गोष्टी, अभ्यासक्रम देण्याचा प्रयत्न राहील. त्यासाठी प्राध्यापक, विद्यार्थी संघटनांची मते विचारात घेतली जातील.

**प्रश्न :** प्राध्यापक, कर्मचाऱ्यांसाठी काय करणार आहात?

**उत्तर :** विद्यापीठात आवश्यकतेपेक्षा प्राध्यापक, कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याचे वास्तव आहे. त्यावर शासन निर्देशानुसार पदांची निर्मिती करून विद्यापीठाचे कामकाज सुरू आहे. रिक्त पदांच्या भरतीसाठी शासनदरबारी पाठपुरावा केला जाईल. प्राध्यापक, कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीची प्रक्रिया प्राधान्याने पूर्ण करणार आहे.

**प्रश्न :** नॅक, एनआयआरएफ रँकिंगबाबत काय सांगाल?

**उत्तर :** नॅक मूल्यांकनामध्ये यावेळी विद्यापीठ आघाडीवर राहील. एनआयआरएफ रँकिंगबाबतच्या ज्या निकषांमध्ये विद्यापीठ कमी पडत आहे, त्यात सुधारणा करून देशातील टॉप-१०० यादीत शिवाजी विद्यापीठाचा समावेश होण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

### तक्रार निवारणासाठी ऑनलाईन प्लॅटफॉर्म

पात्रता आणि परीक्षाविषयक काही मुद्द्यांवर विद्यार्थ्यांच्या अधिक तक्रारी येतात. तक्रार निवारणासाठी ऑनलाईन प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देणार आहे. त्याद्वारे विद्यार्थ्यांना गुणपत्रिका, पदवी प्रमाणपत्र, आदी स्वरुपातील कोणतेही कागदपत्र मिळविण्यासाठी विद्यापीठात हेलपाटे मारावे लागणार नाहीत, असे ते म्हणाले.

### बहुशाखीय विद्यापीठ बनविणार

विविध विद्याशाखांचे शिक्षण हे विद्यापीठाच्या माध्यमातून दिले जात आहे. भविष्याची गरज लक्षात घेऊन नवनवीन विद्याशाखा, अभ्यासक्रम सुरू करून आपल्या विद्यापीठाला बहुविद्याशाखीय विद्यापीठ बनविण्याचे ध्येय आहे, असे डॉ. शिर्के यांनी सांगितले.

पुण्य नगरी

# कुलगुरू डॉ. शिर्के यांचा सत्कार

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. शाल, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह, 'बहुजनपर्व' व 'शाहूंच्या आठवणी' हे ग्रंथ देऊन संस्थेचे अध्यक्ष बी. जी. बोराडे यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा सत्कार श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसच्या वतीने करण्यात आला.

यावेळी संस्थेचे व्हाईस चेअरमन डी. जी. किल्लेदार, कार्यकारिणी सदस्य आर. डी. पाटील, आजीव सेवक प्रा. सी. एम. गायकवाड, उदय पाटील, न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, महाराष्ट्र हायस्कूलचे मुख्याध्यापक ए. एस. रामाणे व उपप्राचार्य यू. आर. आतकिरे, प्रा. कलगोंडा आदी उपस्थित होते.

# ऑप्शन नोंदवा... अन्यथा परीक्षा ऑफलाईन

## विद्यार्थ्यांना उद्यापर्यंतची मुदत : वेळेत अर्ज भरण्याचे विद्यापीठाचे आवाहन

प्रतिनिधी

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्राच्या परीक्षा शनिवार (१७) पासून सुरु होत आहेत. मात्र अद्यापही सुमारे १० हजार ६०० विद्यार्थ्यांनी ऑनलाईन, ऑफलाईन परीक्षेबाबत ऑप्शन नोंदविलेला नाही. या विद्यार्थ्यांनी सोमवार (१२ ऑक्टोबर) पर्यंत आपली नोंदणी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. अन्यथा नोंदणी न केलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयामध्ये उपस्थित राहून बहुपर्यायी पद्धतीने परीक्षा द्यावी



लागणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याचे नियोजन राज्य सरकार व विद्यापीठ प्रशासनाने सुरु केले आहे. ३१ ऑक्टोबरपर्यंत परीक्षा घेऊन १० नोव्हेंबर पूर्वी निकाल लावण्याच्या सूचना विद्यापीठांना दिल्या आहेत. यानुसार १ ऑक्टोबरपासून पुनर्परीक्षार्थी तर १० ऑक्टोबरपासून नियमित अभ्यासक्रमाच्या परीक्षा घेण्याचे नियोजन विद्यापीठाने केले होते. मात्र लेखणी बंद आंदोलन तसेच ऑनलाईन सॉफ्टवेअरची कमतरता यामुळे परीक्षा विभागाचे नियोजन कोलमडले होते. आता १७ ऑक्टोबरपासून या परीक्षा होणार आहेत. एका दिवसात तीन सत्रात परीक्षा घेण्याचे नियोजन परीक्षा विभागाकडून सुरु आहे. सकाळी १० ते ११, १ ते २, ४ ते ५ अशा तीन सत्रात या परीक्षा घेतल्या जाणार आहेत.

पान ४ पहा

# ऑप्शन नोंदवा...अन्यथा परीक्षा ऑफलाईन

**पान १ वरुन**

यासाठी शिवाजी विद्यापीठाने युद्धपातळीवर तयारी सुरु केली आहे. याबाबतचे प्रशिक्षण सोमवारपासून परीक्षा विभागातील कर्मचाऱ्यांना देण्यात येणार आहे. तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने सर्व काळजी घेण्याचे काम सुरु आहे.

दरम्यान, शिवाजी विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्राच्या परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर परीक्षा ऑनलाईन की ऑफलाईन पद्धतीने देणार याबाबत ऑप्शन फॉर्म भरण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. गेल्या १५ दिवसांपासून विद्यापीठाच्यावतीने विद्यार्थ्यांचे मोबाईल नंबर, ईमेल आयडी अपडेट करण्याचे काम सुरु केले आहे. मात्र अद्याप १० हजार ६०० विद्यार्थ्यांनी कोणताच पर्याय निवडला नाही आहे. यामुळे विद्यापीठापुढे या विद्यार्थ्यांच्या परीक्षा कशा घ्यायच्या हा प्रश्न उभा राहिला आहे.

नोंदणी न केलेल्या विद्यार्थ्यांसाठी शेवटची मुदत सोमवार (१२ ऑक्टोबर) सायंकाळी ५ पर्यंत देण्यात आली आहे. येत्या दोन दिवसात विद्यार्थ्यांनी नोंदणी न केल्यास त्यांना ऑफलाईन पद्धतीने परीक्षा द्याव्या लागणार आहेत. संबंधित विद्यार्थ्यास महाविद्यालयामध्ये उपस्थित राहून ही परीक्षा द्यावी लागणार आहे.

# प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसतर्फे कुलगुरूंचा सत्कार

कोल्हापूर : श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसच्या वतीने शिवाजी विद्यापीठाचे नूतन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा संस्थेचे अध्यक्ष बी. जी. बोराडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. डॉ. शिर्के महाराष्ट्र हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजचे माजी विद्यार्थी आहेत. यावेळी संस्थेचे व्हाईस चेअरमन डी. जी. किल्लेदार, कार्यकारिणी सदस्य आर. डी. पाटील, आजीव सेवक प्रा. सी. एम. गायकवाड, उदय पाटील, प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, महाराष्ट्र हायस्कूलचे मुख्याध्यापक ए. एस. रामाणे, उपप्राचार्य यू. आर. आतकिरे, डॉ. कलगोंडा आदी उपस्थित होते.